सोलापूर तरुण भारत

# सदाफुली

https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com

बुधवार, १९ ऑगस्ट २०२६

आतील पानावर

पान २– 'दया नायक'वर बनणार बायोपिक
पान ३ – 'हुमा कुरेशीचं लग्न कधी होणार?
पान ४ – देवरकोंडा– रश्मिकाच्या 'राणाबली'ची रिलीज...
पान ५ – अमृताचं प्रेम हरवलंय...
पान ६ – श्रद्धाचा 'नागिन' येणार लवकरच भेटीला




# गश्मीर महाजनी 'या' सिनेमातून येणार भेटीला

गश्मीर महाजनी गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. दोन दिवसांपूर्वी त्याने एक फोटो पोस्ट शेअर केला होता. या फोटोवर त्याने माझा आवडता प्राणी- माझे बाबा असे लिहिले होते. त्यानंतर त्याच्या या पोस्टची मोठी चर्चा झाली होती. हा त्याचा आगामी सिनेमा असल्याचा अंदाज अनेकांनी व्यक्त केला होता. मात्र, गश्मीरने त्याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती दिली नव्हती. आता गश्मीर महाजनीने पुन्हा एकदा सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. त्याने पुन्हा तसाच फोटो शेअर केला आहे. मात्र, याआधीच्या पोस्टमध्ये पाठमोरी व्यक्ती पाहायला मिळत होती. आता शेअर केलेल्या या पोस्टमध्ये व्यक्तीचा चेहरा समोर असल्याचे दिसत आहे. मात्र, त्याच्या चेहऱ्यावर मास्क आहे. सिंहाचे तोंड असल्याचे दिसत आहे. ही पोस्ट शेअर करताना गश्मीर महाजनीने माझा आवडता प्राणी- माझे बाबा, असे लिहिले आहे. तसेच, चित्रपटाच्या नावाचा खुलासा केला आहे. 'राखणदार' असे सिनेमाचे नाव आहे. हा सिनेमा २०२७ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन गश्मीर महाजनी करणार आहे, तर निर्मिती पंचतंत्र फिल्म्स प्रायव्हेट लिमिटेड करणार आहे. सिनेमात गश्मीर प्रमुख भूमिकेत दिसणार आहे, तर त्याच्याबरोबर सई ताम्हणकर, मकरंद अनासपुरे हे कलाकार दिसणार आहेत. गश्मीरच्या या पोस्टवर नेटकरी भरभरून कमेंट्स करत आहेत. एकाने हार्ट इमोजी शेअर करत लिहिले, सई व गश्मीर, दुसऱ्या एकाने लिहिले, गश्मीर तू माझ्या भावना व आतुरता समजू शकत नाहीस, एकाने लिहिले, या नवीन प्रवासासाठी खूप शुभेच्छा, आणखी एकाने लिहिले, हे खूप अप्रतिम दिसतंय, पाहण्यासाठी खूप उत्सुक आहे, अशा अनेक कमेंट्स पाहायला मिळत आहेत. गश्मीरने याआधी विविध भूमिकांतून, सिनेमांतून प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. त्याला अभिनेता म्हणून मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली. आता तो या सिनेमातून दिग्दर्शनात पदार्पण करत आहे. त्यासाठी त्याला अनेकांनी शुभेच्छा दिल्या आहेत. आता या सिनेमात आणखी कोणते कलाकार दिसणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, गश्मीर महाजनी लवकरच '१०८ बेस हॉस्पिटल उरी' या मालिकेत दिसणार आहे.

# 'राका'त दिसणार त्या तिघी!

दाक्षिणात्य सुपरस्टार अल्लू अर्जुनचा 'राका' चित्रपट सध्या चर्चेत आहे. या चित्रपटात अल्लू अर्जुनसोबत दीपिका पदुकोण, रश्मिका मंदाना आणि जान्हवी कपूर यांसारख्या अभिनेत्री पाहायला मिळणार आहेत. चित्रपटाबाबत आधीपासूनच प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. दिग्दर्शक टली या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. या चित्रपटातील अभिनेत्रींच्या भूमिकेबद्दल माहिती समोर आली आहे. दीपिकाच्या भूमिकेबद्दल सांगायचे तर, ती चित्रपटात एका गरोदर स्त्रीच्या भूमिकेत दिसेल, जी स्वतःच्या अस्तित्वासाठी लढा देते. जान्हवी या चित्रपटात एका आदिवासी राणीची भूमिका साकारत आहे. तर रश्मिका मंदाना एका गाईडच्या भूमिकेत असेल, जिचा संबंध थेट दीपिकाच्या पात्राशी जोडलेला असेल. गरोदर असलेल्या दीपिकाच्या पात्राचे रक्षण करण्याची जबाबदारी तिच्यावर असेल, असे मानले जात आहे. या भूमिकेसाठी तिने बरीच मेहनत घेतली आहे. या तिन्ही अभिनेत्रींच्या कथांमध्ये अल्लू अर्जुनचे 'राका' हे पात्र सर्वात महत्त्वाचे ठरणार आहे. हा चित्रपट असून प्रेक्षक त्याची आतुरतेने वाट पाहत आहेत. हा चित्रपट डिसेंबरमध्ये प्रदर्शित होणार आहे. अल्लू अर्जुनचा हा मोठा प्रोजेक्ट आहे. सध्या चित्रपटाचे काम वेगाने सुरू आहे.




# करिअरसाठी केला प्रेमाचा त्याग



मनोरंजनविश्वात असे अनेक कलाकार आहेत ज्यांनी कधीच लग्न न करण्याचा निर्णय घेतलाय, तर काहींना इतक्यात लग्न करायचं नाहीये आणि काही लग्न न करता लिव्ह इनमध्ये राहणं पसंत करतात. अशातच आता अमीषा पटेलनेही लग्न न करण्याबद्दल सांगितले आहे. अमीषाने एक्सवरील ark my मार्फत चाहत्यांशी संवाद साधताना लग्न करण्याचा कोणताही विचार नसल्याचं सांगितलं. यादरम्यान एका चाहत्याने तिला, लग्न कधी करणार? असा प्रश्न विचारला. त्यावर अमीषा म्हणाली, कधीच नाही. सिंगल राहून मी खूप आनंदी आहे. माझ्यावर प्रेम करणारे माझे १०० जवळचे कुटुंबीय आणि मित्र- मैत्रिणी आहेत. हे सगळं बदलण्यासाठी एका पुरुषाला माझ्या आयुष्यात येऊ देण्याची माझी अजिबात इच्छा नाही. लग्न करण्याचा कोणताही विचार नसल्याचं अमीषा आता सांगत असली, तरी याआधी तिने तिच्या प्रेमसंबंध आणि करिअर यांच्यापैकी एकाची निवड करताना घेतलेल्या कठीण निर्णयांबद्दल भाष्य केलं होतं. चित्रपटसृष्टीत येण्याचा निर्णय घेतल्यानंतर तिच्या जोडीदाराला ते मान्य नसल्यामुळे तिने त्या नात्यातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्याचं सांगितलं. अमीषा म्हणाली, जे लोक तुमच्यावर खरं प्रेम करतात, ते तुमच्या प्रगतीत कधीच अडथळा आणत नाहीत. मी करिअरसाठी खूप काही गमावलं आहे आणि प्रेमासाठीही खूप काही गमावलं आहे. दोन्ही गोष्टींसाठी मी एकमेकांचा त्याग केला आहे. ती पुढे म्हणाली, चित्रपटसृष्टीत येण्यापूर्वी मी एका रिलेशनशिपमध्ये होते. तो मुंबईतील एका उद्योगपती कुटुंबातील मुलगा होता. आमची पार्श्वभूमी, शिक्षण आणि कौटुंबिक वातावरणही सारखंच होतं. पण मी चित्रपटसृष्टीत जाण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्याला ते मान्य नव्हतं. त्यामुळे मला प्रेमापेक्षा करिअरची निवड करावी लागली.

# 'दया नायक'वर बनणार बायोपिक




हिंदी चित्रपटसृष्टीत गुन्हेगारी, अंडरवर्ल्ड व भयपटांची लाट आणणारे प्रयोगशील दिग्दर्शक म्हणून राम गोपाल वर्मा यांना ओळखलं जातं. सत्या, कंपनी, सरकार यांसारख्या यशस्वी चित्रपटांचं दिग्दर्शन त्यांनी केलं आहे. आजही राम गोपाल वर्मांचा मास्टरपीस चित्रपट 'सत्या' हा हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वोत्तम गँगस्टर चित्रपट म्हणता येईल. कामाच्या शोधात मुंबईत आलेल्या सत्याची कथा आहे. परिस्थिती त्याला गुन्हेगारी आणि अंडरवर्ल्डच्या जगात घेऊन जाते. गेल्या अनेक वर्षांपासून राम गोपाल वर्मा इंडस्ट्रीपासून दूर आहेत. मात्र, आता मोठ्या कालवधीनंतर ते चित्रपटसृष्टीत कमबॅक करण्यास सज्ज झाले आहेत. लवकरच ते नवीन कलाकृती घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत.

नुकतीच राम गोपाल वर्मा यांनी त्यांच्या आगामी 'पुलिस कंपनी' या चित्रपटाची घोषणा केली आहे. हा चित्रपट एन्काऊंटर स्पेशालिस्ट 'दया नायक' यांच्या जीवनावर आधारित आहे. आपल्या एक्स अकाउंटवर पोस्ट शेअर करत त्यांनी या प्रोजेक्टबद्दल चाहत्यांना माहिती दिली आहे. हा चित्रपट अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम याच्या गँगशी संबंधित कहाणीवर आधारित असणार आहे. दाऊद इब्राहिमने आपल्या बहुतांशी शत्रू गँगचा खात्मा केला, आणि त्याच्या गँगला एका कंपनीचे स्वरुप दिले. त्यानंतर तो दुबईला गेला आणि त्याचा खास माणूस छोटा राजन याच्याकडे डी- कंपनीकडे सर्व कामकाज सांभाळण्याची जबाबदारी दिली. या नंतर दाऊद आणि छोटा राजन याच्यात फूट पडली. दोघांनी वेगळे मार्ग निवडले आणि अंडरवर्ल्डमध्ये पोकळी निर्माण झाली. या संधीचा फायदा उचलत दुसर्या गँग्जनी आपलं वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरु केला. त्यामुळे मुंबईतील गुन्हेगारी वाढली. यामुळे मुंबईतील परिस्थिती बिघडू लागली पोलीस आणि प्रशासनाने यावर नियंत्रण ठेवणं कठीण होत गेलं.

या परिस्थितीत एक विशेष पथक तयार करण्यात आलं, ज्याने १९९७ ते २००४ या काळात ३०० हून अधिक गुन्हेगारांना ठार केलं. 'पोलीस कंपनी' ही कथा यापासून प्रेरित आहे, ज्यातील दया नायक ही व्यक्तिरेखा हर्षवर्धन राणे साकारत आहे. या चित्रपटात अनेक मोठे कलाकार असून, त्याबद्दलचा लवकरच माहिती देण्यात येईल. असं त्यांनी या पोस्टद्वारे सांगितलंय. विशेष म्हणजे बॉलिवूडचा हॅण्डसम हंक अभिनेता हर्षवर्धन राणे या चित्रपटात मुख्य भूमिका साकारणार आहे.



# हुमा कुरेशींचं लग्न कधी होणार?

गँग्स ऑफ वासेपूर' आणि 'महारानी' फेम अभिनेत्री हुमा कुरेशीने लग्नाबद्दल आपले विचार उघडपणे मांडले आहेत. जाणून घ्या, ही अभिनेत्री लग्न कधी करणार आहे. एका मुलाखतीत हुमा कुरेशीने लग्नाबद्दल आपले विचार व्यक्त केले. ती हसत म्हणाली की, लग्नासाठी थांबावे लागेल. ती म्हणाली, तुम्ही आणि माझी आई दोघेही तोच प्रश्न विचारता. मी लग्न कधी करणार आहे, याचे उत्तर माझ्याकडे अजून नाही. जेव्हा व्हायचे असेल तेव्हा ते होईल. सध्या माझ्याकडे खूप काम आहे. हे वर्ष माझ्यासाठी खूप व्यस्त होते आणि सध्या मी फक्त माझ्या कामावर लक्ष केंद्रित करत आहे. हुमा तिच्या स्पष्टवक्त्या उत्तरांसाठी ओळखली जाते. अलीकडेच, तिने 'टॉक्सिक' चित्रपटातील इंटिमेट सीनमुळे ट्रोल होत असलेल्या कियारा अडवाणीबद्दलही भाष्य केले होते. युवाच्या 'बी अ मॅन यार' या शोमधील संभाषणादरम्यान, निखिल तनेजाने हा मुद्दा उपस्थित केला की यशपेक्षा कियाराला जास्त ट्रोल केले जात आहे. हुमा म्हणाली, हे किळसवाणं, घृणास्पद आहे. पण मला वाटतं की या चित्रपटातील स्त्रिया शेवटी हसतील. प्रत्येक गोष्टीचं समर्थन करण्यात काही अर्थ नाही, कारण तुम्ही शब्दांनी लोकांची मनं बदलू शकत नाही. चित्रपटानेच उत्तर द्यावं अशी माझी इच्छा आहे. हुमा आगामी 'टॉक्सिक' या चित्रपटात दिसणार आहे. गीतू मोहनदास दिग्दर्शित हा चित्रपट २६ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल. या चित्रपटात यशसोबत नयनतारा, कियारा अडवाणी, तारा सुतारिया आणि हुमा कुरेशी यांसारखे मोठे कलाकार आहेत. हुमा यापूर्वी 'बेबी डू डाय डू' या चित्रपटात दिसली होती.

# 'दशमी'त दिग्गज कलाकारांची मांदियाळी!

भारतीय संस्कृतीत विजयादशमी हा केवळ सण नाही, तर अन्यायावर न्यायाचा, अधर्मावर धर्माचा आणि दुष्ट शक्तींवर स्त्रीशक्तीच्या विजयाचा शाश्वत संदेश देणारा दिवस आहे. याच विजयाच्या, शक्तीच्या आणि परिवर्तनाच्या विचारांना समर्पित 'दशमी' हा मराठी चित्रपट ऑक्टोबर महिन्यात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटाची निर्मिती व दिग्दर्शन योगेश पांडुरंग भोसले यांनी केलं आहे. 'दशमी' चित्रपटाच्या पहिल्या पोस्टरचं अनावरण नुकतंच करण्यात आलं. या चित्रपटात महेश मांजरेकर, मकरंद अनासपुरे, विजय निकम, गौरी इंगवले, प्रसन्न केतकर, देवेंद्र गायकवाड, शाम माशाळकर, राज कुंदन आणि दाक्षिणात्य स्टार रवि प्रकाश असे नामवंत कलाकार झळकणार आहेत. दिग्दर्शक योगेश भोसले याबद्दल म्हणाले, दशमी' हा विचार आहे, जो प्रत्येक मुलीला आणि प्रत्येक कुटुंबाला आत्मविश्वास आणि बळ देतो. बॉलीवूड चित्रपटांप्रमाणे भव्य दृश्यरचना आणि उच्च दर्जाचे तांत्रिक सादरीकरण हे 'दशमी' सिनेमाचं खास वैशिष्ट्य आहे. कथानकातील धागेदोरे सहज उलगडत नाहीत. प्रत्येक टप्प्यावर नवे प्रश्न, अनपेक्षित वळणं आणि धक्कादायक खुलासे यामुळे प्रेक्षकांच्या मनात शेवटपर्यंत उत्सुकता निर्माण होईल. या सिनेमाच्या लेखनाची आणि संगीताची जबाबदारी सुरेश पंडित यांनी सांभाळली आहे. मराठी चित्रपटसृष्टीत सस्पेन्स-क्राईम थ्रिलरचा नवा मापदंड निर्माण करण्याची क्षमता असलेला 'दशमी' चित्रपटप्रेमीने मोठ्या पडद्यावर अनुभवावा असा अविस्मरणीय सिनेमॅटिक अनुभव असणार आहे.



# 'मिर्झापूरः द मूव्ही'त श्रियाचा हटके लूक

प्राइम व्हिडीओची लोकप्रिय क्राईम-थ्रिलर वेबसीरिज 'मिर्झापूर'ने गेल्या काही वर्षांत प्रेक्षकांच्या मनावर मोठी छाप पाडली आहे. आता हीच लोकप्रिय कथा मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा मुंबईत पार पडला. या कार्यक्रमात अभिनेत्री श्रिया पिळगावकरने आपल्या हटके अंदाजाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. श्रियाने 'मिर्झापूर'च्या पहिल्या सीझनमध्ये 'स्वीटी गुप्ता' ही भूमिका साकारली होती. मालिकेच्या कथेत स्वीटीचा मृत्यू झाल्याचे दाखवण्यात आले होते. त्यामुळे पुढील कथानकात तिची भूमिका दिसणार नाही, असेच प्रेक्षकांना वाटत होते. मात्र, 'मिर्झापूरः द मूव्ही'च्या टीझर आणि ट्रेलरमध्ये श्रियाची झलक पुन्हा पाहायला मिळाल्याने चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे. मुंबईत झालेल्या 'मिर्झापूरः द मूव्ही'च्या भव्य ट्रेलर लाँच सोहळ्यात श्रिया खास लूकमध्ये सहभागी झाली होती. या कार्यक्रमासाठी तिने काळ्या रंगाचा टॉप आणि प्रिंटेड पॅण्ट असा स्टायलिश पोशाख निवडला होता. तिच्या या लूकला ऑक्सिडाइज्ड दागिन्यांची जोड देण्यात आली होती. श्रियाचा हा हटके अंदाज कार्यक्रमातील उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारा ठरला. या सोहळ्यातील तिचे फोटो सोशल मीडियावरही चर्चेत आहेत. तिच्या चाहत्यांनी तिच्या लूकचे कौतुक केले असून, 'मिर्झापूर'मध्ये पुन्हा श्रियाला पाहण्यासाठी चाहते उत्सुक असल्याचे दिसून येत आहे. २०१८ मध्ये तिचा पहिला सीझन प्रदर्शित झाला होता. या सीरिजमधील दमदार कथा, प्रभावी व्यक्तिरेखा आणि कलाकारांच्या अभिनयामुळे ती प्रेक्षकांमध्ये लोकप्रिय झाली. आता या सीरिजची कथा 'मिर्झापूरः द मूव्ही'च्या माध्यमातून मोठ्या पडद्यावर आणली जात आहे. चित्रपटाच्या ट्रेलरमधून कथेबाबत काही संकेत मिळाले असले, तरी अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत. श्रियाची भूमिका कशी दिसणार, ही देखील उत्सुकतेची बाब आहे. 'मिर्झापूरः द मूव्ही'मुळे वेबसीरिज आणि चित्रपट या दोन्ही माध्यमांमध्ये लोकप्रिय झालेल्या या कथेला नवा विस्तार मिळणार आहे. श्रियाचा हटके लूक आणि ट्रेलरमधील तिची झलक यामुळे या उत्सुकतेत आणखी भर पडली आहे.




# नयनताराने 'टॉक्सिक'साठी मोडले स्वतःचे नियम

बहुप्रतिक्षित चित्रपट 'टॉक्सिक: अ फेअरीटेल फॉर ग्रोन-अप्स' सध्या चर्चेत आहे. चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाल्यानंतर चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे. या चित्रपटात यशसोबत नयनतारा, कियारा अडवाणी यांच्याही महत्वाच्या भूमिका आहेत. विशेष म्हणजे, नयनताराने 'टॉक्सिक'साठी तिचे काही ठरलेले नियम मोडले आहे. याचा खुलासा खुद्द अभिनेत्रीनेच केला आहे. नयनतारा अनेक कलाकार असलेल्या चित्रपटांची निवड करताना खूप सावधगिरी बाळगते. त्यामुळे सुरुवातीला तिला 'टॉक्सिक'मध्ये काम करण्याबाबत काही शंका होत्या. मात्र, दिग्दर्शिका गीतू मोहनदास यांनी तिला चित्रपटाची कथा सांगितल्यानंतर निर्णय बदलल्याचं तिनं सांगितलं. गीतू आणि नयनतारानं जवळपास २० वर्षांपूर्वी एका चित्रपटात एकत्र काम केलं होतं. नयनतारा चित्रपटाच्या प्रमोशनल कार्यक्रमांपासून साधारणपणे दूर राहते. तिला प्रमोशनल इव्हेंट्समध्ये सहभागी व्हायला फारसं आवडत नाही. मात्र, 'टॉक्सिक'च्या ट्रेलर लॉन्चसाठी तिने हा नियमही मोडला. याबद्दल बोलताना नयनताराने सांगितले की, यशने तिला ट्रेलर लॉन्चला येण्याची विनंती केली आणि म्हणून ती या कार्यक्रमाला उपस्थित राहिली. त्यामुळे यशच्या एका विनंतीसाठी नयनताराने तिचा ठरलेला नियम बाजूला ठेवला. गीतू मोहनदास दिग्दर्शित हा चित्रपट २६ ऑगस्ट २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. यश आणि नयनतारा यांना एकत्र पडद्यावर पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत.

# ऋषभ शेट्टीच्या 'जय हनुमान'मध्ये वामिका

साउथ अभिनेता ऋषभ शेट्टी 'कांतारा' सिनेमातून ग्लोबल स्टार झाला. गेल्या वर्षी आलेल्या 'कांतारा चॅप्टर १'नेही बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. 'कांतारा चॅप्टर २'चीही आता चर्चा आहे. दरम्यान त्याआधी ऋषभ शेट्टी 'जय हनुमान' सिनेमाचं शूट पूर्ण करणार आहे. सिनेमातील त्याचा लूक याआधीच समोर आला आहे. यामध्ये राणा दगुबत्तीही महत्वाच्या भूमिकेत दिसेल अशी माहिती काही दिवसांपूर्वी आली होती. तर आता मुख्य अभिनेत्रीचंही नाव समोर आलं आहे. ऋषभ शेट्टीच्या 'जय हनुमान' सिनेमात वामिका गब्बी महत्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. वामिकाची या पॅन इंडिया मायथॉलॉजिकल सिनेमासाठी निवड झाली आहे. प्रशांत वर्मा दिग्दर्शित या सिनेमात तिचं पॉवरफुल कॅरेक्टर असेल. तसंच वामिकाही या मायथॉलॉकिल, ॲक्शन आणि भक्तीमय सिनेमाचा भाग असण्यासाठी आतुर आहे. लवकरच सिनेमाचं शूट हैदराबादमध्ये सुरु होणार आहे. प्रशांत वर्मा यांच्या २०२४ साली आलेल्या 'हनुमान' चा 'जय हनुमान' हा सीक्वेल आहे. पहिल्या पार्टमध्ये तेजा सज्जाने भूमिका साकारली होती. एक असा सामान्य व्यक्ती ज्याला नंतर दैवी शक्ती प्राप्त होतात अशी ती भूमिका होती. आता दुसऱ्या पार्टमध्ये ऋषभ शेट्टीला पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. वामिका गब्बीच्या भूमिकेबद्दल माहिती समोर आलेली नाही पण प्रशांत वर्मांनी जर काही प्लॅन केलं असेल तर ते दमदारच असणार यात शंका नाही. वामिका नुकतीच लोकेश कनगराजच्या 'डीसी' सिनेमात दिसली होती. तिने सिनेमातील अभिनयाने सर्वांना प्रभावित केलं. तसंच ती अक्षय कुमारच्या 'भूत बंगला'मध्येही दिसली. 'पती पत्नी और वो २'मध्येही ती होती ज्याला जेमतेम प्रतिसाद मिळाला.





# देवरकोंडा- रश्मिकाच्या 'राणाबली'ची रिलीज डेट बदलली

दाक्षिणात्य अभिनेता विजय देवरकोंडा आणि अभिनेत्री रश्मिका मंदाना ही लोकप्रिय जोडी आहे. 'गीता गोविंदम' आणि 'डिअर कॉम्रेड' या चित्रपटांमधून दोघांनी प्रेक्षकांची पसंती मिळवली. आता ही जोडी आगामी 'राणाबली' या पीरियड चित्रपटातून पुन्हा एकदा एकत्र पडद्यावर दिसणार आहे. त्यामुळे चाहत्यांमध्ये या चित्रपटाबाबत प्रचंड उत्सुकता आहे. मात्र, आता 'राणाबली'च्या प्रदर्शनाबाबत एक महत्त्वाचं अपडेट समोर आलं आहे.

अहवालानुसार, 'राणाबली'च्या प्रदर्शनाची तारीख पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आली आहे. हा बहुचर्चित चित्रपट आधी ११ सप्टेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार होता. परंतु, आता हा चित्रपट ३० ऑक्टोबर २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित केला जाऊ शकतो. तथापि, या नव्या तारखेबाबत निर्मात्यांकडून अधिकृत घोषणा होणे अद्याप बाकी आहे. रश्मिका मंदानाला नुकतीच दुखापत झाली असून त्यामुळे ती सध्या चित्रपटातील काही दृश्यांचं शूटिंग पूर्ण करू शकत नाही. याच कारणामुळे निर्मात्यांनी चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे. रश्मिका तिच्या दुखापतीतून पूर्णपणे बरी झाल्यानंतर चित्रपटाचं उर्वरित शूटिंग पूर्ण करणार असल्याचं सांगितलं जात आहे.



# अमृताचं प्रेम हरवलंय...

अभिनेत्री अमृता खानविलकर आणि तिचा नवरा अभिनेता हिमांशू मल्होत्रा वैवाहिक आयुष्यामुळे चर्चेत आले आहेत. अमृता आणि हिमांशू गेल्या काही महिन्यांपासून वेगळे राहत असल्याच्या चर्चा आहेत. गेल्या १८ महिन्यांपासून अमृता आणि हिमांशू वेगळे राहत असून त्यांच्या नात्यातही दुरावा आल्याचं बोललं जात आहे. या चर्चांदरम्यानच अमृता खानविलकरने क्रिप्टिक पोस्ट शेअर केली आहे.

अमृताने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये शेअर केलेल्या पोस्टने लक्ष वेधून घेतलं आहे. अमृताने इन्स्टा स्टोरीमध्ये शेअर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलंय की आपण काय बोलतो आणि आपल्याला काय म्हणायचं असतं...आणि आपल्याला काय सांगायचं असतं आणि आपण काय बोलतो यामध्ये बऱ्याचदा प्रेम हरवून जातं.

अमृताच्या या पोस्टमुळे हिमांशूसोबतच्या नात्यात दुरावा आल्याच्या चर्चांना आता उधाण आलं आहे. मात्र अद्याप त्या दोघांनीही यावर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

अमृता आणि हिमांशू यांनी २०१५ मध्ये लग्न केलं होतं. त्याआधी १० वर्ष ते एकमेकांना डेट करत होते. नच बलिए या रिएलिटी शोमध्येही या कपलने सहभाग घेतला होता. या शोच्या सातव्या पर्वाचे ते विजेते होते.

अमृताचा नवरा हिमांशू देखील एक लोकप्रिय अभिनेता आहे. तो गुजराती असून हिंदी टेलिव्हिजनचा लोकप्रिय चेहरा आहे. अनेक बॉलिवूड सिनेमांमध्येही त्याने काम केलं आहे.

# 'जयंती २' चा जबरदस्त टीझर प्रदर्शित

मराठी चित्रपटसृष्टीत काही वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या 'जयंती' या चित्रपटाने सामाजिक आशयामुळे प्रेक्षकांची मने जिंकली होती. छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा तरुणांवर होणारा सकारात्मक प्रभाव प्रभावीपणे मांडणाऱ्या या चित्रपटाला मोठा प्रतिसाद मिळाला होता. आता या यशस्वी चित्रपटाचा पुढील भाग 'जयंती २' येत्या ११ सप्टेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असून, नुकताच त्याचा दमदार टीझर प्रदर्शित करण्यात आला आहे. टीझरमधून 'जयंती २' हा चित्रपट सध्याच्या शिक्षण व्यवस्थेशी निगडित गंभीर विषय हाताळणार असल्याचे स्पष्ट होते. ग्रामीण भागातील एका विद्यार्थिनीला शिक्षण घेताना सहन करावा लागणारा भेदभाव आणि त्यातून उभे राहणारे प्रश्न याभोवती




चित्रपटाची कथा फिरणार असल्याचे संकेत टीझरमध्ये देण्यात आले आहेत. चित्रपटात संत्या या लोकप्रिय पात्राच्या भूमिकेत पुन्हा एकदा अभिनेता ऋतुराज वानखेडे झळकणार आहे. त्याच्यासोबत पायल जाधव, प्रियदर्शनी इंदलकर, ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, देविका दफ्तरदार, विजय निकम, राजकुमार जरांगे यांसारखी दमदार कलाकारांची फळीही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहे. 'जयंती २'ची निर्मिती मेलिओरिस्ट फिल्म स्टुडिओने केली आहे.

# अमेय वाघ माझ्यापेक्षा जास्त सीनियर!

नागराज मंजुळे हे मराठी सिनेमात वेगळ्या धाटणीच्या आणि मातीतल्या कथा सांगणारे दिग्दर्शक म्हणून ओळखले जातात. त्यांनी मराठी सिनेविश्वामध्ये पहिला १०० कोटींचा टप्पा पार करणारा 'सैराट' सिनेमा दिला. काही दिवसांपूर्वी नागराज मंजुळे आणि अमेय वाघ यांचा 'फ्रेम' चित्रपट झी ५ या ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज झाला होता. या चित्रपटामध्ये कॅमेरामॅन म्हणून दोघांची कथा मांडण्यात आली होती. नागराज मंजुळे हे अनुभवी, तर अमेय हा नवोदित कॅमेरामन अशा भूमिका दोघांनी साकारल्या होत्या. या चित्रपटाच्या प्रमोशनमधील एक व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे. त्यामध्ये नागराज हे अमेयला माझ्यापेक्षा जास्त सीनियर असल्याचे म्हणाले होते. मुलाखतीमध्ये अमेयला नागराज मंजुळे यांच्याबरोबर काम करताना कोणत्या गोष्टी शिकायला मिळाल्या, याबद्दल विचारण्यात आले. त्यावर अमेय म्हणाला, त्यांच्या अनेक गोष्टींचं मी निरीक्षण करीत होतो. त्यामुळे त्यांच्या गोष्टी वेचणं हे माझं काम होतं. त्यावर नागराज म्हणाले, खरं तर हा प्रश्न अमेयला विचारला जातोय; पण माझ्या अवतारावरून असं वाटत असेल की, मी फार सीनियर वगैरे आहे आणि मी त्याला काही गोष्टी शिकवायला पाहिजे; पण अमेय अनुभवी माणूस आहे,' पुढे नागराज म्हणाले, ता काही स्वतंत्रपणे शिकत असेल, तर तो त्याचा भाग आहे; पण माझ्याकडे त्याला शिकवण्यासारखं काहीही नाही. अमेय हा माझ्यापेक्षा या इंडस्ट्रीमध्ये जास्त सीनियर आहे. मग अमेयने हसून प्रतिक्रिया देत, खरं तर सगळ्यात पहिलं म्हणजे मी त्यांच्याकडून हा विनम्रपणा शिकलोय, अशी मिश्कील प्रतिक्रिया दिली. पुढे अमेय म्हणाला, नागराज यांना एखाद्या विषयातील खरेपणाचं भयंकर अप्रूप आहे. त्यांच्या स्वतःच्या कामातही त्यांचा खरेपणा आणि सच्चेपणा आहे म्हणूनच ते लोकांना इतकी वर्षं भावत आले आहेत. एखाद्या गोष्टीमध्ये खरेपणा दिसला, तर तो वेचणारे पहिले नागराज असतात. त्यांच्या ती गोष्ट लगेच लक्षात येते आणि ही गोष्ट त्यांच्याकडून शिकण्यासारखी आहे, नागराज यांनी पुढे अमेय खूप तरुण दिसत असल्याचे कौतुक केले.



# यामी गौतमला मिळाली मोठी संधी



'कहानी' या चित्रपटातील अभिनयातून अभिनेत्री विद्या बालनने प्रेक्षकांना प्रभावित केले होते. या चित्रपटाच्या यशानंतर दुसरा भाग देखील रिलीज करण्यात आला होता. त्यानंतर या चित्रपटाचा तिसरा भागही येणार आहे. कहाणी या चित्रपटाचा पहिला भाग २०१२ मध्ये तर दुसरा भाग २०१६ मध्ये रिलीज करण्यात आला होता. या चित्रपटात विद्याने दुर्गा राणी सिंगची भूमिका साकारली होती. आता तिसऱ्या भागावर काम सुरू करण्यात आले आहे. निर्मात्यांकडे 'कहानी ३' साठी एक नवीन कल्पना आहे. ते ही फ्रँचायझी पुढे नेत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, तिसऱ्या भागात विद्या बालनचा पत्ता कट करण्यात आला असून, तिच्या जागी अभिनेत्री यामी गौतमला संधी मिळणार असल्याचे सांगण्यात येत आहे. यामीने तिच्या चित्रपटांमधील उत्कृष्ट अभिनयासाठी प्रशंसा मिळवली आहे. याची दखल घेत तिला आर्टिकल ३७० साठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार नुकताच मिळाला. यानंतर तिला कहानी ३ साठी कास्ट करण्यात आले आहे. मात्र याबाबत चित्रपट निर्त्यांकडून अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. 'ओएमजी २', 'लॉस्ट' आणि 'दसवी'मधील यामीच्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांवर तिने छाप सोडली. ती नेहमीच काहीतरी वेगळ देण्याचा प्रयत्न करत असल्याचे तिच्या अभिनयातून दिसून येते. निर्माते लवकरच कहानी ३ साठी यामीच्या नावाची घोषणा करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. विद्या बालनच्या 'कहानी' चित्रपटाचे दिग्दर्शन करणारे सुजॉय घोष हेच तिसऱ्या भागावर काम करत आहेत. २०१२ च्या 'कहानी' चित्रपटात विद्याने आपल्या पतीच्या शोधात असलेल्या एका गर्भवती महिलेची भूमिका साकारली होती. तर 'कहानी २' मध्ये विद्या एका लहान मुलीसोबत दिसली होती. दोन्ही चित्रपट प्रेक्षकांपर्यंत आपली कथा पोहोचवण्यात यशस्वी ठरले आणि बॉक्स ऑफिसवर देखील चांगली कमाई केली.

# भोंदूबाबा अशोक खरातवर येतोय चित्रपट!

नाशिकचा ढोंगी बाबा अशोक खरात याच्या लैंगिक शोषण आणि ४७ कोटींच्या आर्थिक घोटाळ्यावर आधारित 'महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स' या चित्रपटाचा थरारक टीझर रिलीज झाला आहे. या चित्रपटात बिग बॉस मराठी फेम दिपाली सय्यद ही रुपाली चाकणकर यांच्या भूमिकेत दिसणार आहे. भोंदूबाबा खरात याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण, फसवणूक केली. स्वतःमध्ये दैवी शक्ती असल्याचे भासवून, अंधश्रद्धा पसरवून आणि कुटुंबाला मृत्यूची भीती दाखवून त्याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केले. अशोक खरातला भेटायला अनेक राजकीय नेतेही गेल्याचे फोटो समोर आले होते. रुपाली चाकणकर यांचे खरातसोबतचे काही फोटो आणि व्हिडीओ, ज्यात त्या खरातचे पाद्यपूजन करत आहेत आणि डोक्यावर छत्री धरत आहेत, सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. या प्रकरणी अशोक खरातला अटक झाली व सध्या तो तुरुंगात आहे. 'महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स' या चित्रपटाचा पहिला टीझर रिलीज झाला आहे. या चित्रपटात चाकणकर यांची भूमिका बिग बॉस मराठी फेम अभिनेत्री दिपाली सय्यद साकारणार आहे. टीझरमध्ये एका भव्य महालासारख्या वास्तूसमोर लोक उभे दिसतात. तिथे एक कार येते, त्यातून खरात उतरतो आणि चाकणकर त्याच्यासाठी छत्री धरतात असं पाहायला मिळतं. नंतर खरात पुढे चालत जातो, असंही टीझरमध्ये दाखवण्यात आलं आहे. शेवटी अभिनेते उदय टिकेकर यांची झलक दिसते. हा चित्रपट २ ऑक्टोबर २०२६ रोजी रिलीज होणार आहे.

# श्रद्धाचा 'नागिन' येणार लवकरच भेटीला

अभिनेत्री श्रद्धा कपूरच्या 'नागिन' या चित्रपटाबाबत एक अपडेट समोर आली आहे. सहा वर्षांपूर्वी श्रद्धा कपूरच्या 'नागिन' चित्रपटाची घोषणा झाली होती. पण नंतर हा चित्रपट बंद करण्यात आल्याची चर्चा सुरु झाली. परंतु आता या चित्रपटाचे काम सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. श्रद्धा कपूरच्या या आगामी चित्रपटाच्या निर्मात्यांनी स्पष्ट केले आहे की, हा चित्रपट बंद झालेला नाही आणि त्यावर अजूनही काम सुरू आहे.

चित्रपटातील मुख्य भूमिकेसाठी श्रद्धा कपूरचे नाव निश्चित असून ती यामध्ये 'इच्छाधारी नागिन'ची भूमिका साकारणार आहे. चित्रपट निर्माते निखिल द्विवेदी यांनी सांगितले की, मला माहीत आहे की मी अनेकदा या चित्रपटाबाबत विधान केले आहे, पण आता आम्ही हा चित्रपट लवकरच सुरु करणार आहोत. चित्रपटाचे शूटिंग अजून सुरू झालेले नाही, पण लवकरच सर्व गोष्टी पूर्वपदावर येतील. चित्रपटाबाबत कोणतीही नवीन माहिती न आल्याने चित्रपट रद्द झाल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. मात्र, निर्मात्यांच्या स्पष्टीकरणामुळे पुन्हा आशेचा किरण दिसला आहे. 'नागिन' या चित्रपटासाठी अभिनेत्री श्रद्धा कपूर हिचे नाव आधीच निश्चित झाले असून, ती यात इच्छाधारी नागिणीची भूमिका साकारणार आहे. श्रद्धा कपूरने २०२० मध्ये एका ट्विटद्वारे ती मोठ्या पडद्यावर 'नागिन' बनणार असल्याची माहिती शेअर केली होती. दुसरीकडे, अभिनेता कार्तिक आर्यन देखील 'नागजिला' या चित्रपटातून सापांची वेगळीच दुनिया दाखवणार आहे. दरम्यान, 'नागिन'पूर्वी श्रद्धाचा बहुचर्चित 'ईठा' हा चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची चाहते देखील आतुरतेने वाट पाहत आहे.



# मधुबाला! संगीतमय कोंदणातील हिरा: श्रीनिवास खळे

'या चिमण्यांनो परत फिरारे। घराकडे अपुल्या...' (जिव्हाळा- १९६८) श्रीनिवास खळे हे रसायनच वेगळे होते. सुगम संगीत प्रकारातले हे गाणे त्यांच्या संगीतात फक्त लताच गाऊ शकल्या. अनिल गोवारीकर या शास्त्रीय संगीत पारंगत तज्ज्ञाने या गाण्यातील काही तांत्रिक बाजू मांडल्या आहेत... पहिली ओळ 'या चिमण्यानो' पुरिया धनश्रीत आहे तर दुसरी 'घराकडे अपुल्या। जाहल्या' हे मारवा रागात आहे. यातील सौंदर्य स्थळे फिरा रे, इथे फिरा नंतर छोटासा पॉज घेऊन कोमल रिषभाचा स्पर्श करून उच्चार. हा कोमल रिषभातील रे - अत्यंत जीवघेणा व गायला कठीण. दुसरी ओळ 'घराकडे अपुल्या' यातही अपुल्या म्हणताना कोमल रिषभाचा सामना आहेच. पहिल्या ओळीत रागाची योजना करून दुसर्या ओळीत दुसऱ्या रागात प्रवेश करताना लय मात्र तशीच कायम राखली. इथेच खळे यांचे सांगीतिक कौशल्य सिद्ध झाले. लता यांच्या स्वरांना आणखीन श्रुती जोडून स्वर अंतर्मुख करून गाण्यातील मूळ आशय अधिक खोल करून ही रागिणी अजरामर केली.

**'लळा जिव्हाळा शब्दच खोटे। माश्या मासा खाई कुणी कुणाचे नाही राजा। कुणी कुणाचे नाही...'**

वरील चित्रपटातील खळे यांचे गाणे गाताना खूप दडपण होते, असे सुधीर फडके स्वतः म्हणाले. संथ स्वरात एकेक शब्दावर किंचित वजन देऊन सुरुवात होते. कुणी कुणाचे नाही, मध्यम स्वरात म्हणताना जगाबद्दलचे नैराश्य भाव प्रकट होतात. 'बळावता बळ पंखामधले। पिल्लू उडून जाई...' संथ सुरात जगरहाटी वर्णवून तिसरा



अंतर्यातील आर्त गंभीर स्वर थोडे तात म्हणून 'पिल्लू उडून जाई' म्हणताना परत कोमल स्वरात जगाची अपकारी रीत उद्धृत केली. 'प्रिया तुज काय दिसे स्वप्नात। आनंदाचे पाझर फुटले। मिटलेल्या नयनात' वरील चित्रपटातीलच हेही गाणे आहे. गदिमांच्या शब्दांच्या धाग्यांना खळे यांनी शामकल्याण रागातील संगीताच्या मागावर विणून आशाताईच्या जादुई व तरल आवाजाच्या कशिद्याने मढवलेली ही संगीत पैठणी आजही रसिकांनी आपल्या हृदयात जतन करून ठेवली आहे.

'मनासारखी मिळे सहचरी। फुलून दरवळे सुख संसारी...' स्वप्नातील कुंचल्याने ओढलेल्या रेघोट्यात केवळ सुखांची भरती नयनांच्या कोंदनात साठवल्यागत वाटावे अशा आशयाचा पाझर आशाताईच्या स्वरातून खळे यांनी फोडला. 'आई आणखी बाबा यातुनी। कोण आवडे अधिक तुला...' (बोलकी बाहुली- १९६१) आईवडिलांबद्दलच्या बालमनातील बालसुलभ निरागस भावनांचे सुरेख स्वरांकन आशा व उपाताई यांच्या सुरात खळे यांनी केले. बालवयाला साजेशी, बासरी, सतार हार्मोनियमच्या साथीत गोड लयीत मुलांच्या संवादातील गोडवा थोडा खट्याळ थाटात अधोरेखित करून सौम्य व मऊ छटेच्या ताल संगतीत हे बालगीत सादर केले. 'देवा दया तुझी की ही शुद्ध दैवलीला। लागो न दृष्ट माझी माझ्याच वैभवाला' वरील चित्रपटात परमेश्वराच्या परम कृपेची जाण खळे यांनी सुमन कल्याणपूर यांच्या सुरेल स्वरातून लीन भावात प्रकट केली. संथ स्वरात सुरू केलेले है तृप्त आर्जव म्हणताना- लागो न दृष्ट वैभवाला भरभरून पावलेल्या वरदानाने माझीच दृष्ट माझ्या वैभवाला न लागो असे कृतकृत्य भावात स्वरांकित केले. (१) एका तळ्यात होती बदके पिले सुरेख. (२) गोरी गोरी पान फुलासारखी छान'

१९५०-५१ च्या काळात 'लक्ष्मीपूजन' चित्रपटासाठी गदिमांनी शब्दांकित केलेल्या या दोन्ही अमर गाण्याचे जन्मदाते श्रीनिवास खळे होते व आशा भोसले यांनी गायले होते, हे कित्येकांना माहीत नसेल. चित्रपट प्रदर्शित न झाल्यामुळे गदिमांनी स्वतः पुढाकार घेऊन १९५२ साली एचएमव्हीकडून या गाण्यांच्या तबकड्या काढल्या व भावगीते म्हणून ही दोन्ही गाणी मराठी रसिकांच्या घरातील मौल्यवान दागिना ठरला; ज्याची चकाकी आजही कायम आहे. खळे यांच्या छोट्याशा मराठी सिनेकारकीर्दीतील काही निवडक गीतांना उजाळा देण्याचा प्रयास केला.

मंगेश पाडगावकर : खळे यांच्या संगीतात शब्द जिवंत होतात, असे वाटते.

'तुका म्हणे ऐसा सोहळा भूवरी। शब्दांचा मुका सूर घेई'

पु. ल. देशपांडे : एका डहाळीवरून फुलपाखरू जसे अलगद दुसर्या डहाळीवर जाते तसेच खळे यांचं गाणं अंतर्यावरून मुखड्यावर केव्हा परतते समजत नाही.

संगीतकार नौशाद : इतने अच्छे गीत हम नही बना पाये. आप नॅशनल प्रॉपर्टी हो. ऐसा कलाकार अब कहाँ?

'जय जय महाराष्ट्र माझा। गर्जा महाराष्ट्र माझा' राजा बढे यांनी लिहिलेल्या, शाहीर साबळे यांनी गायलेल्या व खळे यांनी संगीताच्या पालखीत बसविलेल्या या गीताला महाराष्ट्र राज्य गीताचा मान मिळाला आहे. आयुष्यभर सुरांची पालखी निष्ठेने वाहणारे श्रीनिवास खळे यांचा जन्म ३० एप्रिल १९२६ रोजी मुंबईत झाला. १९४५-४६ साली श्रावण मास सोबतीला आला. मुंबईस गदिमाचे 'श्रावणातल्या त्या रात्रीची शपथ घालते तुला' हे गाणे संगीतात सजविले. ध्यानीमनी संगीताचा ध्यास असलेल्या खळे यांनी, अवीट चालींनी अभंग, प्रेमगीते, भावगीते, लावण्या आदी सर्व संगीत प्रकार आपल्या संगीताने नटविले. केवळ सहा मराठी चित्रपटांना संगीत दिले. मराठी भावगीतांचे ते अढळ नक्षत्र होते. त्यांच्या अलौकिक मधाळ चालींनी अनेक दशके मराठी रसिक भारावला होता. भीमसेन जोशी व लता यांच्या स्वरात 'राम-श्याम' धून स्वरांकित केली. मंगेश पाडगावकर लिखित 'शुक्रतारा' चे संगीत खळे यांचेच आहे. गायक व संगीतकार शंकर महादेवन यांना खळे यांनीच घडविले. त्यांना महाराष्ट्र सरकारचा लता मंगेशकर पुरस्कार व बालगंधर्व पुरस्कार मिळाला. २०१० साली भारत सरकारने 'पद्मभूषण' ने विभूषीत केले. संसारात अनेक मळभ आलीत, पण संगीतातील चांदण्यांना कधीच खळे पडू दिले नाही. ज्या राजहंसाने संगीत दुग्धसागरातून दुग्ध व जल विलग करून शुद्ध स्वरांनी रसिकांचे कान तृप्त केले ते थोर संगीतज्ञ श्रीनिवास खळे २ सप्टेंबर २०११ रोजी राम श्याम धून वाजवीत नेहमीसाठी आनंदाच्या डोहीतील आनंद तरंगात विलीन झाले. 'आनंदाचे डोही आनंद तरंग...'

**रमेश पोफळी**

# स्टालिन- तृषा वादामुळे 'कुरुवी' पुन्हा चर्चेत

तमिळ चित्रपटसृष्टी आणि राजकारणात सध्या उदयनिधी स्टालिन यांच्या एका वक्तव्याची जोरदार चर्चा सुरू आहे. अभिनेत्री तृषा कृष्णन यांच्याबाबत केलेल्या कथित वादग्रस्त वक्तव्यामुळे उदयनिधी स्टालिन यांच्यावर टीका होत आहे. या प्रकरणामुळे सोशल मीडियावरही मोठी चर्चा रंगली आहे. दरम्यान, या वादाच्या पार्श्वभूमीवर २००८ मध्ये प्रदर्शित झालेला 'कुरुवी' हा तमिळ चित्रपट पुन्हा चर्चेत आला आहे. कारण या चित्रपटाची निर्मिती स्वतः उदयनिधी स्टालिन यांनी केली होती.

उदयनिधी स्टालिन यांनी निर्माता म्हणून चित्रपटसृष्टीत पदार्पण 'कुरुवी' या चित्रपटातून केले होते. या चित्रपटात आजचे तमिळनाडूचे मुख्यमंत्री आणि लोकप्रिय अभिनेता थलपती विजय प्रमुख भूमिकेत होते, तर अभिनेत्री तृषा कृष्णन यांनी नायिकेची भूमिका साकारली होती. या चित्रपटाचे दिग्दर्शन धरानी यांनी केले होते.

२००५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'घिली' या चित्रपटाला प्रचंड यश मिळाल्यानंतर दिग्दर्शक धरानी यांनी विजय आणि तृषा या लोकप्रिय





जोडीला पुन्हा एकत्र आणण्याचा निर्णय घेतला. त्यातून 'कुरुवी' या चित्रपटाची निर्मिती झाली. चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता होती. 'कुरुवी'ची कथा वेत्रिवेल नावाच्या तरुणाभोवती फिरते. या कथेत तृषा कृष्णन यांनी 'देवी' ही भूमिका साकारली होती.

विजय आणि तृषाची जोडी त्या काळात प्रेक्षकांमध्ये खूप लोकप्रिय होती. आजच्या घडीला या चित्रपटाची चर्चा होण्याचे मुख्य कारण म्हणजे उदयनिधी स्टालिन यांच्याभोवती निर्माण झालेला वाद. एका राजकीय कार्यक्रमादरम्यान त्यांनी अभिनेत्री तृषा कृष्णन यांच्याबाबत कथित वादग्रस्त टिप्पणी केली. त्यानंतर या वक्तव्यावरून मोठा वाद निर्माण झाला. पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. या घटनेनंतर सोशल मीडियावर विजय, तृषा आणि उदयनिधी स्टालिन यांच्याशी संबंधित अनेक जुने व्हिडीओ आणि चित्रपटांतील दृश्ये पुन्हा व्हायरल होऊ लागली.


विशेषतः 'कुरुवी' चित्रपटातील विजय आणि तृषाच्या दृश्यांची पुन्हा चर्चा सुरू झाली. या संपूर्ण घडामोडीत आणखी एक विशेष बाब म्हणजे, ज्या चित्रपटातून उदयनिधी स्टालिन यांनी निर्माता म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली, त्याच चित्रपटाचा नायक पुढे तमिळनाडूचा मुख्यमंत्री झाला. तर उदयनिधी आज राज्यातील प्रमुख विरोधी नेत्यांपैकी एक आहेत. त्यामुळे राजकारण आणि चित्रपटसृष्टी यांचा हा अनोखा योगायोगही सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.



# माधुरी आजही तितकीच मेहनत घेतेय...

माधुरी दीक्षित बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिने आतापर्यंत अनेक चित्रपटात विविध भूमिका साकारत प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. अभिनयासह तिने तिच्या नृत्याने व सौंदर्यांनेही अनेकांची पसंती मिळवली. फक्त प्रेक्षकच नाही तर कलाकार मंडळीही तिचे चाहते आहेत आणि अनेकदा तिच्याबरोबर काम करण्याच्या संधीच्या शोधात असतात. अशातच आता लोकप्रिय अभिनेता सुमीत राघवननेही माधुरीसह काम करण्याचा अनुभव सांगितला आहे. सुमीत राघवनने मराठी, हिंदी व गुजराती अशा अनेक भाषेतील कलाकृतींमध्ये काम केलं आहे. विशेषकरुन मराठी व हिंदीत त्याने महत्त्वपूर्ण भूमिका साकारत त्याची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अशातच आता त्याने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत त्याच्या अभिनय प्रवासाबद्दल सांगितलं आहे. यावेळी त्याने माधुरीसह काम करण्याचा अनुभव सांगत तिचं कौतुक केलं आहे. सुमीत राघवनने माधुरी दीक्षितसह 'बकेट लिस्ट' या चित्रपटात काम केलं होतं. त्याने तिच्या ऑनस्क्रीन नवऱ्याची भूमिका साकारली होती. अशातच आता दिलेल्या मुलाखतीत त्याने याबद्दल सांगितलं आहे. माधुरीबरोबरच्या या चित्रपटाबद्दल विचारल्यानंतर सुमीत म्हणाला, तो खूप चांगला चित्रपट मला मिळाला. तेजस देवस्कर माझा मित्र आहे. आम्ही एकाच जिममध्ये वर्क आऊट करायचो. तो म्हणाला सुमीत दादा एक चित्रपट आहे, मी दिग्दर्शन करत आहे. माधुरी दीक्षित त्यात असणार आहे. मी चकीत होत म्हणालो माधुरी मग ती कोण असणार आहे माझी. तो म्हणाला जोडीदार. मी म्हटलं मी करतो. तो म्हणाला कथा ऐका मी न ऐकताच म्हटलं मला आवडलीये गोष्ट. सुमीत याबद्दल पुढे म्हणाला, पण तो चित्रपट करताना मजा आली. हे लोक का इतके मोठे आहेत याची पुन्हा एकदा प्रचिती आली. आजही तितकीच मेहनत घेण्याची तयारी, चिकाटी, आवड आहे. दिग्दर्शक मोठा असतो. त्यामुळे तिने त्याला काही सुचवलं आणि तो जर म्हणाला की माधुरी मॅम नको तर ती ओके ठिके असं म्हणते. त्या चित्रपटातलं एक रोमँटिक गाणं करतानाही मजा आली. दरम्यान, तेजस देवस्कर यांनी 'बकेट लिस्ट' या मराठी चित्रपटाचं दिग्दर्शन केलं होतं. माधुरी दीक्षित यामध्ये मुख्य भूमिकेत होती आणि हा तिचा पहिलाच मराठी चित्रपट होता.

# लवकरच येणार खुशी कपूरचा 'मॉम २'




दिग्गज अभिनेत्री श्रीदेवी यांचा 'मॉम' हा चित्रपट २०१७ मध्ये प्रदर्शित झाला आणि बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरला. आता, नऊ वर्षांनंतर, त्याचा सिक्वेल बनणार असून, यासंदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. 'मॉम २' मध्ये खुशी कपूर मुख्य भूमिका साकारणार आहे. हा २०१७ च्या हिट चित्रपट 'मॉम'चा सिक्वेल असून, तो नोव्हेंबर २०२६ मध्ये चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची निर्मिती तिचे वडील, बोनी कपूर करत असून, याचे चित्रीकरण नोएडा आणि ग्रीसमध्ये झाले आहे.

वृत्तानुसार, 'मॉम २' हा श्रीदेवींच्या त्या अविस्मरणीय भूमिकेशी जोडलेला असेल, ज्यामुळे त्यांना ओळख मिळाली. 'मॉम' हा श्रीदेवींचा शेवटचा चित्रपट होता, त्यामुळे हा प्रोजेक्ट खुशी कपूरसाठी खूप भावनिक आणि खास मानला जातो, कारण ती तिच्या आईचा वारसा पुढे नेताना दिसणार आहे. खुशी कपूरने 'द आर्चीज'मधून पदार्पण केले होते. परिणामी, 'मॉम २' हा तिच्या कारकिर्दीतील एक महत्वाचा टप्पा मानला जात आहे. वृत्तानुसार, चित्रपटाचे सुरुवातीचे फुटेज पाहिलेल्या एका सूत्राने खुशीच्या अभिनयात लक्षणीय सुधारणा झाल्याचे नमूद केले. त्यांच्या मते, या वेळी खुशीच्या अभिनयात अधिक भावनिक खोली दिसून येते आणि काही प्रसंगांमध्ये तिच्यात श्रीदेवीची झलकही दिसते.

# आमिरसोबत प्रीतीला पुन्हा करायचीय स्क्रीन शेअर



बॉलिवूडची डिंपल गर्ल अभिनेत्री प्रीती झिंटा तब्बल ८ वर्षांनंतर रुपेरी पडद्यावर पुनरागमन करत आहे. यादरम्यान तिच्या सुपरहिट ठरलेल्या 'दिल चाहता है' चित्रपटाला २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. या निमित्ताने प्रीतीने चित्रपटाशी संबंधित जुन्या आठवणींना उजाळा दिला. फरहान अख्तर दिग्दर्शित 'दिल चाहता है' या चित्रपटाला याच महिन्यात २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. या निमीत्त सेलिब्रेशनसाठी आयोजित रीयुनियनमध्ये प्रीतीला सहभागी होता आलं नाही. याबद्दल बोलताना प्रीतीने मिश्कीलपणे सांगितलं की, तिला आपल्या कमबॅक चित्रपटाच्या प्रमोशन आणि 'दिल चाहता है'च्या रीयुनियनपैकी एकाची निवड करावी लागली. प्रीती म्हणाली की, तिला अनेक जुन्या आठवणी शेअर करायच्या होत्या. मात्र, आमिरनेच त्यांचं 'बंटवारा' केलं. तिला 'बंटवारा १९४७'च्या प्रमोशनसाठी यावं लागलं, तर चित्रपटातील इतर कलाकार 'दिल चाहता है'च्या २५ वर्षांच्या सेलिब्रेशनसाठी एकत्र आले. आमिरसोबत पुन्हा काम करण्याची इच्छा यावेळी प्रीतीने आमिर खानसोबत पुन्हा स्क्रीन शेअर करण्याची इच्छाही व्यक्त केली. दोघांनी पुन्हा एखाद्या चांगल्या आणि लक्षात राहणाऱ्या चित्रपटात एकत्र काम करावं, अशी तिची इच्छा आहे. आमिरसोबत पुन्हा काम करण्यासाठी उत्सुक असल्याचं प्रीतीने सांगितलं. फरहान अख्तर लिखित आणि दिग्दर्शित 'दिल चाहता है' सिनेमात आमिर खान, सैफ अली खान, अक्षय खन्ना, प्रीती झिंटा, सोनाली कुलकर्णी आणि डिंपल कपाडिया यांच्या प्रमुख भूमिका होत्या. या चित्रपटाची कथा कॉलेजचं शिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रेम, मैत्री आणि आयुष्यातील विविध गुंतागुंतींचा सामना करणाऱ्या तीन मित्रांभोवती फिरते. या चित्रपटाची वेगळी कथा, दमदार अभिनय आणि आजही लोकप्रिय असलेलं संगीत प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलं होतं. या चित्रपटाला राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारही मिळाला होता. त्यामुळे २५ वर्षांनंतरही 'दिल चाहता है'ची लोकप्रियता कायम आहे.